महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

दुरध्वनी क्र.०२०-२६३०६१००/२६१३५२६३
Email : edmkvdcpune@gmail.com / edmkvdc.punewrd@maharashtra.gov.in

**कार्यकारी संचालक**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ**
**सिंचन भवन,मंगळवार पेठ,पुणे-४११०११**

जा.क्र.मकृखोविम./ (३९/४१६/२०२३)/आ-२/ ६३५५ /सन २०२३ दिनांक: ०३/११/२०२३

**प्रति,**

मुख्य अभियंता (जसं),
जलसंपदा विभाग,
पुणे-११.

**विषय:-** खडकवासला धरण परिसर येथे सुशोभिकरण व पर्यटंकासाठी सोयी सुविधा निर्माण करणेसाठी जागा उपलब्ध करुन “ **ना-हरकत**” मिळणेबाबत.

**संदर्भ :** १) मुख्य अभियंता (जसं),पुणे यांचे पत्र जा.क्र. प्रशा-६/ ४६२६ दि. ०५-१०-२०२३
२) महामंडळाची कार्यकारी समितीची १७० वी बैठक दिनांक ०९/१०/२०२३
३) मुख्य अभियंता (जसं),पुणे यांचे पत्र जा.क्र. प्रशा-६/ ५०७८ दि. ३१-१०-२०२३

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खडकवासला धरण परिसर येथे सुशोभिकरण व पर्यटंकासाठी सोयी सुविधा निर्माण करणेसाठी जागा उपलब्ध करुन ना-हरकत मिळणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.३ अन्वये सादर केला आहे.

मा.आमदार श्री. भिमराव तापकीर, विसस यांनी खडकवासला धरण परिसरामध्ये सुशोभिकरण व पर्यटंकासाठी सोयी सुविधा निर्माण करणेसाठी पर्यटन विभागाच्या उपलब्ध निधीतून करणेच्या उद्देशाने पर्यटन विभागाने जलसंपदा विभागाच्या सदर जागेवर पर्यटन सुविधा निर्माण करणेसाठी विकसन कालावधीकरिता “ना-हरकत” मिळणेबाबत महामंडळास विनंती केली आहे.

कार्यकारी समितीच्या १७० वी बैठकीमध्ये खडकवासला धरण परिसरामध्ये पर्यटन विभागाच्या उपलब्ध निधीतून पर्यटन सोयीसुविधा निर्माण करणेसाठी, खालील अटींअधिन नियामक मंडळाच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

**अटी -**

१. सदर जागेचा मालकी हक्क कायमस्वरूपी जलसंपदा विभागाचा राहील.
२. सदर जागेवर पर्यटनसुविधा निर्माण करणेसाठी पर्यटन आराखडयास जलसंपदा विभागाची मान्यता घेण्यात यावी व त्यानुसार करण्यात येणाऱ्या कामाचा सर्व खर्च पर्यटन विभागाने करणे बंधनकारक राहील.
३. पर्यटनसुविधा निर्माण केल्यानंतर त्याची ५ वर्षे देखभाल दुरूस्ती करण्याची जबाबदारी पर्यटन विभागाची राहील.
४. सदर जागेवर मंजूर पर्यटन आराखडयानुसार बांधकाम करता येईल याव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

५. सदरच्या जागेचा वापर उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणेच करावा. अन्य कारणासाठी त्या जागेचा वापर करु नये अन्यथा सदर ना-हरकत रद्द करण्यात येईल.

त्यानुषंगाने **फेज-१** मधील Oxygen Park, CR masonry Compound wall, Chin Link Fencing, Cafeteria, Toilet Block, Paved Pathway, Gazebos & solar Street lights इ. कामे तसेच **फेज-२** मधील (Chowpatty Development ) Fine ashler stone Entrance gate, RCC Retaining Wall with S S railing seating musical fountain paving block, solar lights) इ. कामे करण्यास नियामक मंडळ मंजूर करील त्या अटी व शर्ती पर्यटन विभागास मान्य करणे बंधनकारक राहील, या शर्तीच्या अधिन महामंडळाची **"ना-हरकत"** कळविण्यात येत आहे.

**स्थळ प्रत** मा.का.सं.**यांना मान्य असे.**

(शा.अ.हिंगे)
**विशेष अधीक्षक**
**म.कृ.खो.वि.म.पुणे.**

प्रत- अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे-११ यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी .